**CNR NO. MHST05-000496-2018**

**वि.दिवाणी मुकदमा क्र. २२५/२०१८**

राधाबाई सदाशिव चव्हाण वगैरे ..... **वादी**

**वि.**

आशिष सदाशिव चव्हाण वगैरे ..... **प्रतिवादी**

**नि. ३२ वरील आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांच्याविरुध्द झालेला विनाकैफियत दावा चालविण्याचा आदेश रद्द होणेकामी दाखल केला आहे.

२. प्रस्तुत अर्जास वादी यांनी म्हणणे देवून अर्जास तीव्र विरोध केला आहे.

३. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादीच्या वकिलांचे निवेदन असे की, प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांच्या पत्नीस मुखत्यारपत्र करुन दिले होते व त्या आधारे दि.१८/०१/२०१९ रोजी त्या दाव्यात हजर झाल्या होत्या. प्रतिवादी क्र.१ हे भारतीय सैन्य दलात नोकरीस असल्याने कैफियत देण्यासाठी आवश्यक ती माहिती वकीलांना देणे शक्य झाले नाही. त्यामुळे त्यांना वेळेत कैफियत दाखल करता आली नाही व त्यांच्याविरुध्द दावा विनाकैफियत चालविणेबाबतचा आदेश झाला आहे. सदरकामी प्रतिवादीची कैफियत दाखल करुन घेतली नाही तर प्रतिवादीचे पैशाने न भरुन येणारे नुकसान होणार आहे व त्यांना त्यांच्या कायदेशीर हक्कास कायमचे मुकावे लागणार आहे. उलट कैफियत याकामी दाखल करुन घेतलेस वादी यांचे कांहीही नुकसान होणार नाही व न्यायदान सुलभ होणार आहे. त्यामुळे सदरचा विनाकैफियतचा आदेश रद्द करण्यात यावा. वादी यांचे वकिलांचे निवेदन असे की, प्रतिवादीने कराड व पाटण येथे स्वतंत्र दावे दाखल केले आहेत. त्या दाव्यांमध्ये प्रतिवादी न्यायालयात आले होते. त्यामुळे नोकरीतून वेळ मिळाला नसल्यामुळे कैफियत देता आली नाही हे कारण अयोग्य असल्याने अर्ज रद्द करावा असे त्यांनी म्हटले आहे.

४. प्रतिवादीचा अर्ज व त्यावर वादीने दिलेले म्हणणे व युक्तिवादातील केलेली कथने विचारात घेता तसेच प्रस्तुतचा दावा हा वादीने प्रतिवादीविरुध्द स्थावर मिळकतीतील हक्क व अधिकार याबाबत दाखल केलेला असल्याने त्यासंबंधीचा पुरावा न्यायालयासमोर येणे गरजेचे आहे. प्रतिवादीला कैफियत देणेची संधी दिल्यास दाव्याचा गुणदोषावर निर्णय होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. तथापि प्रतिवादीनी कैफियत देण्यास केलेल्या विलंबाबाबत त्याच्यावर खर्च बसविणे न्यायोचित होणार आहे. म्हणून मी खालील आदेश देत आहे.

# आदेश

प्रतिवादी क्र.१ विरुध्द दावा विनाकैफियत चालविण्याचा झालेला आदेश र.रु.५००/- खर्चादाखल वादीना देण्याच्या अटीवर रद्द केला आहे.

(न्यायासनावर अधिघोषीत केले)

कराड. **(प्र. अ. सवदीकर)**
दि. १९/०७/२०१९ सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कराड